पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९.
जा.क्र.इक्षेका/४/कावि/३१८/२०१८
दिनांक-२७/११/२०१८

प्रति,

मा.----------------------------
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०७/१२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **शुक्रवार दिनांक ०७/१२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती
भोसरी, पुणे-३९

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
मासिक सभेचे वेळी आपले विभागाशी संबंधीत विषयाबाबत सविस्तर टिपण/माहितीसह उपस्थित राहावे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## इ प्रभाग समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ९

**दिनांक- ०७ / १२/२०१८ रोजी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **शुक्रवार दिनांक ०७/१२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.** वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **संत ज्ञानेश्वर महाराज”** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ०२/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ८) सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र.१)** प्रभाग क्र.५ मधील सखुबाई उद्यानाजवळील शौचालय, पैसे द्या व वापरा या तत्वावर देणेबाबत. **स्थापत्य विभागाकडील पत्र क्र. इ/स्था/कावि/१११५/ २०१८, दिनांक २३/१०/२०१८ चे पत्र.** प्रभाग क्र.५ मधील सखुबाई उद्यानाजवळील शौचालय इमारत पैसे द्या व वापरा तत्वावर मे.सुविधा इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी देणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय यांनी शिफारस केली आहे तरी सदर शौचालय मे.सुविधा इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी ३० वर्षे देणेकामी मा. इ प्रभाग समितीची प्रशासकीय मान्यता घेण्याकामी सदर विषय मा. इ प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी ठेवण्यात येत आहे.

**विषय क्र.२)** प्रभाग क्रमांक ५ मधील बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे नामकरण करणे बाबत दिनांक०७/१२/२०१७ चे पत्रान्वये इ क्षेत्रीय (प्रभाग समिती) मासिक सभेत दिनांक ०७/१२/२०१७ रोजी ऐनवेळचा विषय मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने दाखल करुन घेण्यात आला होता. सदरचे सभेत प्रभाग क्र.०५ मधील बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे बॅडमिंटन हॉल असे नामकरण करण्याबाबत ठराव क्रमांक २१ दिनांक ०७/१२/२०१७ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. सदरचा ठराव दिनांक ०४/०१/२०१८ चे मासिक सभेत कायम करण्यात आला आहे. तथापि प्रभाग क्र.०५ अ चे नगरसेवक श्री.सागर बाळासाहेब गवळी यांनी दिनांक ०७/०२/२०१८ चे पत्रान्वये सदरचे बॅडमिंटन हॉलचे नावात फेरबदल करावयाचा असलेने नाव देण्याची अंमलबजावणी करण्यात येऊ नये असे कळविले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ चे १ (र) अन्वये महानगरपालिकेने पारित केलेल्या कोणत्याही ठरावात तो पारित झाल्यानंतर तीन (३) महिन्याचे आत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र अशा ठरावात एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक द्वितीयांश (१/२) पालिका सदस्यांनी किंवा कोणत्याही विवक्षीत बाबतीत या अधिनियमान्वये आवश्यक असेल अधिक संख्ये इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल. किंवा तो रद्द करता येईल. खंड (ह) मधील आवश्यक गोष्टी पुर्ण करुन अशा सभेची नोटीस देण्यात आली असली पाहिजे. आणि अशा नोटीशीत ज्या

ठरावात अशा सभेत फेरबदल करण्याचे किंवा तो रद्द करण्याचे योजीले असेल तो ठराव आणि अशा ठरावात फेरबदल करण्यासाठी असलेली सूचना किंवा प्रस्ताव पुर्णपणे नमूद केला पाहीजे. सदर विषयाबाबत नियमाधीन कार्यवाहीसाठी सभेपुढे ठेवण्यात यावे. सदर विषयाबाबत निर्णय घेणे.

**विषय क्र.३)** मा.सागर बाळासाहेब गवळी, नगरसदस्य यांचे दिनांक २६/११/२०१८ रोजीचे पत्र.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीच्या मासिक सभेमध्ये ठराव क्रमांक २१ दिनांक ७/१२/२०१७ रोजीच्या नामकरणाचा ठराव रद्द करुन प्रभाग क्रमांक ५ येथील बॅडमिंटन हॉलला कै. शंकर परशुराम गवळी यांचे नामकरण करणेत यावे. सदरची जागा गवळी कुटुंबियांनी दिलेली आहे. तरी स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्याच्या भावनेने त्यांनी दिलेल्या जागेबद्दल ऋण व्यक्त करुन सदर बॅडमिटन हॉलला कै. शंकर परशुराम गवळी यांचे नामकरण करण्यात यावे. सदरचा ठराव मंजूर करुन सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती
भोसरी, पुणे-३९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/४/कावि/३१८/२०१८
दिनांक- २७/११/२०१८